
सकाळ

दिवाळी, ऑक्टोबर २०१६

₹ १२५

# साप्ताहिक



## संकल्पाचं सतत स्मरण

बाबा आमटे यांच्या सहवासात आनंदवनातील पंधरा दिवसांचं वास्तव्य संपवून परतीच्या प्रवासाला लागलो, ती तारीख होती २० मे १९७९; निघताना बाबांचे आशीर्वाद घ्यायला गेलो तेव्हा ते म्हणाले, 'तुझी डायरी दे जरा इकडं.' त्या डायरीमध्ये आशीर्वादपर एक वाक्य त्यांनी लिहून दिलं, 'संकल्पाचे सतत स्मरण हाच जप - तुझा बाबा.' तो आशीर्वाद घेऊन मी पुढच्या प्रवासाला निघालो होतो. पंधरा दिवस प्रत्यक्ष बाबांबरोबर आनंदवनात फिरून काम पाहताना त्यांच्याबरोबर जे संवाद झाले त्या वेळी मी पुढच्या प्रवासात २५ ते ३० वर्षांत मला काय करायचं आहे, याचा शोध घेत होतो आणि त्याचबरोबर मी त्यांना माझे संकल्पही सांगत होतो. म्हणूनच कदाचित आशीर्वादपर संदेशात बाबांनी लिहिलं होतं, 'संकल्पाचे सतत स्मरण हाच जप.' परतीच्या प्रवासापासून मनामध्ये माझ्याच संकल्पांची आवर्तनं सुरू झाली होती आणि मी माझ्या भविष्याचा शोध घेत होतो. पुढं प्रत्यक्ष जीवनामध्ये आज ३७ वर्षांनंतर याच संकल्पातून 'लोकसाधना' साकारली. अजूनही माझा हा जप चालूच आहे..

## 'संतांचे आप्त'

माझे एक ज्येष्ठ मार्गदर्शक गुरू प्राचार्य राम शेवाळकर यांच्याबरोबर मी चार दिवस प्रवास केला. काही दिवसांपूर्वीच मी 'गांधी विरुद्ध गांधी' हे नाटक पाहिलं होतं. थोडा अस्वस्थ झालो होतो. प्रवासातच नानासाहेब म्हणाले, 'का रे जरा अस्वस्थ दिसतोयस, काय झालंय तुला?' म्हटलं, 'जरा विस्कटल्यासारखं झालंय. नुकतंच 'गांधी विरुद्ध गांधी' पाहिलं आणि अस्वस्थ झालो. का बरं असं घडत असावं? अनेक थोरामोठ्यांच्या घरात, संत-महात्म्यांच्या घरात पितापुत्रांमधील वाद दिसून येतात. सार्वजनिक जीवनातील, सार्वजनिक कार्यकर्त्यांचे विचार आणि कार्य पुढच्या पिढ्यांतून परावर्तित झालेले दिसत नाहीत आणि चांगल्या सार्वजनिक कार्यकर्त्यांची घराणेशाही काही अपवाद वगळता निर्माण झालेली दिसत नाही. असं का बरं होत असावं?' नानासाहेब म्हणाले, 'खरं तर याचं उत्तर कठीण आहे; पण मी एका वाक्यात सांगू? 'संतांचे जे आप्त ना होती कधी ते संत.' हे वाक्य ऐकलं आणि मी अंतर्मुख होऊन स्वतःच्या जगण्याचा, कुटुंबाचा आणि अपत्यांचा संदर्भ घेऊन पुन्हा एकदा स्वतःच्या शोधात मग्न झालो.



## सज्जनशक्तीचा साक्षात्कार

माझ्या छोट्याशा आयुष्यामध्ये 'लोकसाधना' करीत असताना मी ज्या अनेक महनीय व्यक्तींच्या संपर्कात आलो, त्यातील एक कर्मयोगी व्यक्तिमत्त्व म्हणजे पद्मश्री डॉ. भंवरलालजी जैन. भगीरथ प्रयत्नांनी शून्यातून एक नवी सृष्टी साकार करणारे जळगावचे मोठे भाऊ हे उत्तुंग व्यक्तिमत्त्व अचानक एक दिवस प्रत्यक्ष आमच्या घरी चिखलगावला आले. त्यांच्याविषयी केवळ ऐकून होतो; पण प्रत्यक्ष ओळखदेख नव्हती. त्यांना भेटलो मात्र आणि मला सज्जनशक्तीचा साक्षात्कार झाला.

'राजा, अरे समाजात अनेक चांगली माणसं आहेत; परंतु त्यांची सज्जनशक्ती एकवटलेली नाही त्यामुळं समाजामध्ये तिचा प्रभाव दिसत नाही. ही सज्जनशक्ती जर एकवटली तर समाजाला साक्षात्कार होईल आणि विस्कळित समाजरचनेमध्ये तिचा प्रभाव दिसून येईल. खरं तर यासाठीच आज मी तुमच्याकडं आलोय. तुमची 'लोकसाधना' पाहिल्यावर मी लोकांना सांगेन, जवळ काही नसताना काय करता येतं, हे पाहायचं असेल तर तुम्ही चिखलगावला जा आणि जवळ सर्वकाही आहे आणि काय करता येतं हे पाहायचं असेल तर तुम्ही माझ्याकडं जळगावला या.'

गेली २५ - ३० वर्षं तुम्ही चांगले विद्यार्थी घडविण्याचं काम केलंत, आता गरज आहे ती तुम्ही चांगले शिक्षक घडविण्याची. त्यासाठी तुम्ही अध्यापक विद्यालय सुरू करा.' त्यावर मी म्हणालो, 'भाऊ आमच्यासारख्या सामान्य कार्यकर्त्यांची ती ताकद नाही. त्यासाठी ज्या काही वाईट गोष्टी कराव्या लागतील त्या मी करू शकत नाही. ही अध्यापक विद्यालयं कशी सुरू होतात आणि चालतात हे मी सांगण्याची गरज नाही. त्यामुळे भाऊ माझ्याकडं त्या क्षमता आहेत असं मला वाटत नाही.' 'अरे तुझ्यातल्या क्षमता तुला माहीत नाहीत. अनेकवेळा आपल्यातल्याच शक्तींची आपल्याला जाणीव नसते. जरा स्वतःचा शोध घे. तुझ्यातली सज्जनशक्तीच तुझ्याकडून काम करून घेईल.' आणि आम्ही अपप्रवृत्तींना शरण न जाता अध्यापक विद्यालय सुरू केलं, ते त्यांच्याच आशीर्वादानं आणि सहयोगानं. हे काम करत असताना, स्वतःचा शोध घेताना मला खऱ्या अर्थानं सज्जनशक्तीचा साक्षात्कार होत होता.